जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 AUG 2017
तरुण भारत

# डॉ. रंगनाथन जयंतीनिमित्त कविता वाचन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त वाचन कट्टयाच्या माध्यमातून पावसाळी कविता वाचन आणि भित्तिपत्रिका यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात कवितेवरील भित्तिपत्रिकेच्या प्रकाशनाने व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कवी मारुती मांगोरे, राजेंद्रकुमार पाटील व विक्रम वागरे यांनी या वाचन कट्टयामध्ये कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली.

याप्रसंगी विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. विद्यापीठातील ज्ञान स्त्रोत केंद्र संचालिका डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. आभार सहाय्यक प्राध्यापक डॉ. युवराज जाधव यांनी केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विद्यापीठातील पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.